मैत्री कक्षाच्या व्यावसायिक सेवा खर्चापोटी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास रू.१,१६,११,००८/- रक्कम अदा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. मेइम-२०१९/प्र.क्र.१०८/उद्योग-८,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १४ मे, २०१९

<u>वाचा:-</u> १) शासन पत्र क्र.ई-बीज-२०१३/प्र.क्र.११७/उद्योग-८, दि.४.७.२०१३
२) शासन निर्णय क्र.इ बीज-२०१३/ प्र.क्र.११७/ उद्योग-८ दिनांक १/३/२०१४
३) शासन निर्णय क्र. मेइम-२०१५/ प्र.क्र.१०५ / उद्योग-८ दिनांक ११/२/२०१६
४) शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्र.अर्थसं -२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि. ०१/०४/२०१९.
५) शासन निर्णय क्र.अर्थसं-२०१९/२०१९-२०/(प्र.क्र. ३५)/ प्रशासन-१, दि.०३ /०४/२०१९
६) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र. उ.सं./ मैत्री-II/प्रस्ताव/२०१९/ए-६४५, दि.१०.०४.२०१९

प्रस्तावना:-

राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार राज्य शासनाने दि. २७/०२/२०१४ पासून राज्यात गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या गुंतवणूकदारांना सहाय्य करण्यासाठी एकात्मिक सुलभता कक्ष महाराष्ट्र उद्योग व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री कक्ष) मुंबई येथे स्थापन करण्यात आला आहे.सदर कक्षाच्या सन २०१७-१८ मधील व्यावसायिक सेवा विषयक बाबींच्या खर्चाच्या रकमा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अदा केल्याने सदर रकमेची प्रतीपूर्ती करण्याबाबतचा प्रस्ताव उद्योग संचालनालयाने संदर्भाधीन क्र.६ येथील दि.१०.०४.२०१९ च्या पत्रान्वये सादर केला आहे. संदर्भ क्र १ येथील शासन पत्र व २ येथील दि.११.०२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मे.सिकॉम लि.या संस्थेस अदा केलेल्या व्यावसायिक सेवाविषयक बाबींच्या खर्चाच्या रकमांची प्रतीपूर्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

"मैत्री" कक्षासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने व्यावसायिक सेवा विषयक बाबींसाठी (मे.सिकॉम लि. या संस्थेच्या सल्लागारांच्या सेवाशुल्कपोटी अदा केलेल्या) सन २०१७-१८ मध्ये केलेला खर्च रु.१,१६,११,००८/- (अक्षरी रुपये एक कोटी सोळा लक्ष अकरा हजार आठ फक्त) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या उपलब्ध तरतुदीतून अदा करण्याबाबत उद्योग संचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर खर्च "मागणी क्र.के-७, मुख्य लेखाशिर्ष -२८५२, उद्योग,८०,सर्वसाधारण, १०२ औद्योगिक उत्पादकता, (००) (१५) "मैत्री कक्षाकरिता खर्च (योजनांतर्गत) (२८५२ ए ०२२)" या लेखाशिर्षाखाली उपशिर्ष २८- व्यावसायिक सेवा या उपशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक

वर्षात अर्थसंकलपीय वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या रु.१६५.०० लक्ष इतक्या तरतुदीमधून, रु.१,१६,११,००८/-(अक्षरी रुपये एक कोटी सोळा लक्ष अकरा हजार आठ फक्त) भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०१९ निधी वितरणाच्या शासन परिपत्रक क्रमांक- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३,दिनांक ०१/०४/२०१९ मध्ये नमुद केलेल्या सर्व अटीशर्तींची पूर्तता होत असल्याने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्र. २०१९०५१४१६४५०२१३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shraddha Deven Kocharekar

Digitally signed by Shraddha Deven Kocharekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=189da489d797e1e6a67b7d97496ef7068391629 9eab51c867c5a13147d142a80, cn=Shraddha Deven Kocharekar
Date: 2019.05.17 14:45:54 +05'30'

(श्रध्दा कोचरेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. विकास आयुक्त (उद्योग) तथा अध्यक्ष मैत्री, उद्योग संचालनालय, मुंबई-३२.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
४. संचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३२.
५. सहायक संचालक, (वित्त व लेखा), उद्योग संचालनालय, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई, /निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
७. उपसचिव (प्रशासन), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१६ / अर्थसंकल्प-१४), मंत्रालय, मुंबई-३२.
९. कक्ष अधिकारी, प्रशासन-१, उ.ऊ. व का.वि., मंत्रालय, मुंबई-३२.
१०. निवड नस्ती (उद्योग-८).